**महाराष्ट्र शासन**
गृहनिर्माण विभाग,
मुख्य इमारत, दालन क्र.३०२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२

दूरध्वनी क्र .०२२ २२७९४१२४
Email ID : do३.hou-mh@nic.in

---

**क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२१/झोपसु-१** **दिनांक :०६ जून, २०२३.**

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**विषय :- निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करण्यासाठी विकासकांची नामिकासूची (Empanelment) तयार करण्याबाबत.**

संदर्भ:- आपले पत्र क्र. झोपुप्रा/अभि/कार्या.ow/६०५७, दि.०६.०२.२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,

१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त अर्जापैकी वर्गवारीनिहाय A मध्ये १५, B मध्ये ९ व C मध्ये ६ अशा एकूण ३० विकासकांचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विकासकांची नामिकासूची (Empanelment of Developer) मध्ये समावेश करण्यात शासन मान्यता देण्यात येत आहे.

२) तसेच, ज्या विकासकांना भाडे थकविल्याच्या कारणास्तव अपात्र (Defaulter on Rent) ठरविण्यात आले आहे, त्यांनी झोपडीधारकांचे संपूर्ण थकीत भाडे अदा करुन विकासकांच्या नामिकासूचीत समावेशासाठी अर्ज केल्यास ते आवश्यक अटी/शर्तींची पूर्तता करीत असल्याची खात्री करुन त्यांचा शासनाच्या पूर्वमान्यतेने नामिकासूचीत समावेश करण्यात यावा.

३) विकासकांच्या नामिकासूचीतील विकासकाची निविदाप्रक्रियेद्वारे रखडलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी निवड झाल्यास सदर विकासकाने ३ वर्षात योजना पूर्ण करणे बंधनकारक राहील. सदरहू ३ वर्षापैकी २ वर्षाचे आगाऊ भाडे विकासक संबंधित योजनेतील पात्र झोपडीधारकास प्रथमत:

अदा करेल. तसेच पुढील १ वर्षाच्या भाड्यापोटी पुढील तारखेचे धनादेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा करेल.

२. तेंव्हा, विषयानुषंगाने पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, अशी विनंती आहे.

आपला,

( प्रशांत पु. राठोड )

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**